# परिचर्या महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

## ई-दरपत्रक अर्ज

(लिफाफा क्र. १)

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर.

**विषय** :- सन २०२१-२२ करीता परिचर्या वसतिगृहात भोजन व्यवस्था पूरविण्याबाबत दरपत्रक भरण्याबाबत

मा. महोदय,

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांचे अधिनस्त असलेल्या परिचर्या महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील वसतिगृहात सन २०२१-२२ या वर्षातील प्रथम/द्वितीय सत्राकरीता भोजन व्यवस्था पूरविण्यासाठी दर्शविलेले दर सर्व प्रकारचे खर्चासह असुन ई-दरपत्रकाच्या अटी व शर्तीनुसार तथा इतर सुचनेनुसार भोजन पूरविण्याकरीता दरपत्रकधारक तयार आहेत. तसेच अटी व नियमानुसार दिलेल्या दराप्रमाणे भोजन पुरविण्याची हमी दरपत्रकधारक देत आहे. तसेच कार्यालयाचे अटी व शर्ती दरपत्रकधारकास मान्य आहेत. कंत्राट मंजुर झाल्यास रुपये २००००/-(विस हजार रुपये फक्त) जमानत ठेव अनामत रक्कम ज्या स्वरुपात घेण्यात येते त्या स्वरुपात भरण्यास तयार आहेत.

१) ई-दरपत्रकधारकांचे/ संस्थेचे नाव व पत्ता.

२) मुंबई शॉप एस्टॅबलीशमेंट अंतर्गत
रजिस्ट्रेशन क्रमांक

३) महानगरपालिकेचा भोजनालयाची अनुमती
किंवा परवानगीपत्र.

४) जीएसटी क्रमांक व कर
भरल्याचे प्रमाणपत्र

५) आयकर पूर्ण भरल्याचे प्रमाणपत्र

६) अन्न व औषधी विभागाचा व्यवसायाबाबत परवाना.

वरिल अनूक्रमांक १ ते ६ मधील तरतुदी अटी व शर्ती ई-दरपत्रक धारकांना पुर्णतः बंधनकारक राहतील. या अटींची पुर्तता न केल्यास दरत्रके तांत्रिकदृष्टया अपात्र ठरेल हे मला/आम्हाला मान्य राहील.

दरपत्रक धारकांची सही व पत्र व्यवहाराचा
पुर्ण पत्ता व शिक्का

टिप - कंत्राटदाराचा सविस्तर अटी व शर्ती दरपत्रका सोबत सोबत जोडलेला आहे.

Scanned By Scanner Go

# मेस बाबत नियम व अटी

## भोजन व्यवस्थेचा तपशिल तथा शर्ती व अटी

१) जेवणाची वेळ सकाळी १२ ते २ व संध्याकाळी ६.३० ते ८ या दरम्यानच जेवण देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

२) चहा, नाश्ता व इतर रीफ्रेशमेंट हे सकाळी ७ ते ८ व संध्याकाळी ४ ते ५ या दरम्यानच देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

३) दिवसभऱ्याच्या जेवणामध्ये खाली दिलेल्या प्रमाणे पदार्थ असावे लागेल भोजनात तोचतोच पणा टाळण्याकरीता भाजीत बदल करावा लागेल.

४) महिन्यातून दोन वेळेस फिस्ट द्यावी लागेल फिस्टमध्ये वेजसाठी स्वीट व नॉन-वेज देता येईल जेवण तयार करण्याकरीता वापरात येणारे तेल रिफाईन फल्ली/सनफलावर असावे.

५) दर आठवडयातुन एकदा बदल म्हणून त्यात स्विट देणे आवश्यक आहे.

**प्रत्येक दिवसाचा आहार खलील प्रमाणे असावा**

**पदार्थ**

**सकाळीचे वेळ ७ ते ८ वाजता नाश्ता:-** उपमा,पोहे, इडली साभार चटणी, मोड आलेली कडधान्याची उसळ, वडा सांबार इत्यादी (कोणतेही एक).

**दुपारचे जेवण १२ ते २ :-** वरण, भात, भाजी, पोळी, पापड, चटणी/ सलाद,

**संध्याकाळी ४ ते ५ वाजता चहा बिस्कीट**
**रात्रीचे जेवण सायंकाळी ७ ते ८ वाजता :-** वरण, भात, भाजी, पोळी, लोणच/ सलाद कोशिंबीर/लोणच/ ताक/दही (भाज्या ऋतूनुसार उपलब्ध असलेल्या हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असावा)

**महिन्यातुन दोन वेळेस फिस्ट द्यावी लागेल**

**वेजिटेरियन :-** पनीर भाजी, स्वीट.
**नॉनवेजिटेरियन :-** मटण/चिकन/ फिश/ अंडे.

**आजारी विद्यार्थ्यांकरीता :-** तांदुळ मुंगदाळ खिचडी, साबुदाना खीर, शीरा, फळांचा रस, उकळलेले अंडे/ऑम्लेट, दुध १ ग्लास.

६) स्वयंपाकासाठी लागणारी सर्व भांडी, भट्या, सीलेंडर, खाद्य पदार्थ, आचारी, मदतनिस, जेवण वाढणारे इत्यादी व्यवस्था दरपत्रक धारकास करावी लागेल.

७) भोजनाचे डबे, ताट, वाटया, पेले इत्यादी संबंधित वस्तु ठेकेदारास पुरवाव्या लागतील. तसेच वसतिगृहातील भोजन कक्ष, स्वयंपाकगृह व परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील. तसेच प्रत्येक बुधवार व रविवार या दिवशी डिसइन्फेक्टन्टच्या पाण्यांनी मेस स्वच्छ धुवून काढावी लागेल. मेस चालविण्याकरिता मेस मालकाला दिलेले सर्व सामान मेस सोडतेवेळी परत करावे, एखादी वस्तु तुटल्यास किंवा हरविल्यास मेस मालकाकडून वसूली करण्यात येइल.

८) भोजन पुरेसे व उत्तम दर्जाचे असावे परंतु वरिल दर्शविलेल्या परिमाणाचे पुरविण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

Scanned By Scanner Go

९) सदर भोजनामुळे किंवा अस्वच्छेतेमुळे भोजन घेणाऱ्याच्या जिवितास, आरोग्यास होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी निविदा धारकाची राहील. तसेच अन्न व औषधी प्रशासनाचे नियमानुसार दंड तसेच कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील. मुंबई शॉप एस्टॅब्लीशमेंट ॲक्ट अंतर्गत क्रमांक, जीएसटी दाखला तसेच अन्न व औषधी प्रशासन यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडावे लागेल.

१०) दरपत्रका मंजुर आदेश प्राप्त झाल्यानंतर संबधित दरपत्रका धारकानी अनामत रक्कम रुपये २०,०००/- रोखीने द्यावी लागेल.

११) विद्यूत मिटरच्या वापराप्रमाणे प्रत्येक महिन्याला विजेचे बिल निविदा धारकाकडुन आकारण्यात येईल. मेसचे वार्षिक भाडे १२०० प्रमाणे द्यावे लागेल. मेस मध्ये वापर होणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे बिल ३००/- रुपये दर माहे या प्रमाणे द्यावे लागेल.

१२) मेस मध्ये वापरात येणारी गॅस व इतर ज्वलनशिल वस्तु करिता फायर ॲस्टीग्युशर लावण्याची व्यवस्था व सर्व वस्तुचे सुरक्षा दरपत्रक धारकानी करण्यात यावी.

१३) मेस फी ही कंत्राटदारानी / पुरवठा दारांनी महीण्याच्या सुरुवातीलाच परस्पर विद्यार्थ्यां कडुन वसुल करावी.

१४) भोजन व्यवस्था असमाधानकारक आढळल्यास सदरील व्यवस्था त्वरीत रद्द करण्याची तसेच त्वरीत इतर कंत्राटदारास देण्याचा अधिकार या कार्यालायाने राखून ठेवलेला आहे. याबाबत कंत्राटदारास कोर्टात जाण्याचा अधिकार राहणार नाही.

१५) दरपत्रके मंजुरीनंतर दरपत्रकधारकास आवश्यक तो करारनामा रु. १०० चे स्टॅम्प पेपरवर त्याच्याच खर्चाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये प्रत्यक्ष कंत्राट सुरु होण्यापुर्वी भरुन द्यावा लागेल.

१६) ठरवून दिलेल्या वेळेच्या आत दरपत्रक धारकाने भोजन व्यवस्था सुरु न केल्यास होणाऱ्या विलंबास निविदा धारक सर्वस्वी जबाबदार राहील व होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच निविदा अटींचा भंग केला असे गृहीत धरुन बयाना रक्कम जप्त केली जाईल. तसेच मान्य निविदा धारकास काळया यादीत समाविष्ठ केले जाईल.

१७) भोजन योग्य रितीने न पुरविल्यास अथवा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्यास दरपत्रक धारकास दंड करण्याचे तथा सुरक्षित ठेव रक्कम जप्त करण्याचे, निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना राहतील. दिलेल्या मुदतीत दरपत्रक धारकाने भोजन व योग्य प्रमाणपत्र न पुरविल्यास वसतिगृहात पर्यायी व्यवस्था करेल व त्यानुषंगाने होणारी अतिरिक्त खर्चाची रक्कम ही निविदा धारकास देय असलेल्या रकमेतुन कपात करण्यात येईल किंवा वसुल करण्यात येईल व ते निविदा धारकास बंधनकारक राहील.

१८) भोजन गुणवत्तेमध्ये शंका उत्पन्न झाल्यास ते शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राहतील व त्यावर होणारा खर्च निविदा धारकास द्यावा लागेल. ही रक्कम पुरवठा देयकातुन वसुल केली जाईल.

१९) दरपत्रक धारकाने पुरविलेले भोजन भेसळयुक्त आहे असे निदर्शनास आल्यास व तसे सिध्द झाल्यास भेसळ प्रतिबंधक कायदा व अन्न व औषधी प्रशासन अंतर्गत होणाऱ्या कार्यवाहीस दरपत्रक धारक पात्र राहतील.

२०) विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीत्व मेस कमिटीचा अहवाल दर महिन्याला कमिटीसमोर सादर करण्यात येईल त्यात काही भोजन व भोजनव्यवस्था संबधी सुचना असल्यास त्यानुसार कत्राटदाराला योग्य त्या बदलाच्या सुचना देण्यात येतील

२१) बयाना रक्कम/अनामत रक्कम, काही कारणामुळे देय असलेली रक्कम परत करण्याकरीता विलंब झाल्यास त्यावर दरपत्रकधारकास व्याज आकारता येणार नाही.

Scanned By Scanner Go

२२) दरपत्रक धारकास काही कारणास्तव करार रद्द करण्याच्या पुर्वी ३० दिवस अगोदर लेखी कळविणे आवश्यक आहे अन्यथा रद्द केलेला करार गृहित धरला जाणार नाही. याबाबत होणाऱ्या नुकसानीस दरपत्रक धारक पुर्णतः जबाबदार राहील.

२३) सदर दरपत्रकसोबत जोडलेल्या सर्व अटी व शर्ती आम्ही / मी वाचलेल्या असुन त्या मला / आम्हाला मान्य असुन त्या आम्हावर बंधनकारक राहतील मी / आम्ही प्रतिज्ञापुर्वक लिहुन स्वाक्षरी केलेली आहे.

२४) कंत्राटदाराने वसतिगृहात भोजन देतांना भोजनाचे वेळी स्वत दररोज प्रत्यक्ष हजर राहीले पाहीजे व विद्यार्थ्यांच्या अडचणी मा. अधिष्ठाता / प्राचार्या व विद्यार्थ्यांची मेस कमीटी यांच्या उपस्थितीत सोडविल्या जातील व विद्यार्थ्यांचे भोजनाची तक्रार येणार नाही याकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

२५) दरपत्रक धारकांने निविदा भरतांना मुलांचा/मुलींच्या वसतिगृहाकरीता प्रती विद्यार्थी प्रती माहे भोजनाचे दरासहीत दर द्यावेत प्राप्त निविदा मधुन त्या विभागाचे नागपूर शहरातील मुलांच्या वसतिगृहाकरीता जो दर कमी असेल तो दर लागु करण्यात येईल. कंत्राटदाराचे वर्तन अनुभव क्षमता व्यवहार लक्षात घेवून हे कार्यालय मंजुर झालेल्या दरपत्रक धारकास कंत्राट देईल

२६) कंत्राटदाराने वसतिगृहात भोजन देतांना भोजनाचे वेळी स्वतः दररोज प्रत्यक्ष हजर राहील व विद्यार्थ्यांचे अडचणी मा.अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या उपस्थितीत सोडविल्या जातील व विद्यार्थ्यांच्या भोजनाची तक्रार येणार नाही याकडे लक्ष द्यावयास पाहीजे.

२७) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ, नाशिक च्या प्रात्याक्षिक परिक्षेच्या वेळी परिक्षकांचे जेवण मेस मधून देणे आवश्यक राहील.

२८) वेळोवेळी नियमात होणारे बदल आपणास लागू व बंधनकारक राहतील.

वरिल अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

ठिकानः-नागपूर.

दिनांक.

दरपत्रकधारकांची सही व शिक्का

Scanned By Scanner Go

# परिचर्या महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

(लिफाफा क्र.२)

१) ई-दरपत्रक क्र. पमशावैम/मेस दरपत्रके/ / २०२१ दि.

२) दरपत्रके दि. रोजी दु. वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.

३) दरपत्रकाचा लिफाफा क्र.१ दि. रोजी दु. वाजता अधिष्ठाता कार्यालयातील सभागृहामध्ये उघडण्यात येईल.

| कामाचे विवरण | विद्यार्थ्यांची संख्या | प्रति विद्यार्थी/ प्रति माह भोजनाचे दर |
|---|---|---|
| परीचर्या महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे विद्यार्थ्यांकरीता मेस सुरु करण्याबाबत | २०० | |

दिनांक :

दरपत्रक धारकांची सही व पत्र व्यवहाराचा
पुर्ण पत्ता व शिक्का

Scanned By Scanner Go

महाराष्ट्र शासन

# परिचर्या महाविद्यालय शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर

## COLLEGE OF NURSING GOVT. MEDICAL COLLEGE, NAGPUR

Email – congmcnag@rediffmail.com Fax No. – 0712-2701614

जावक क्र.परिमहा/शावैम/मेस/ 591 /२०२१ दिनांक:-१८/०८/२०२१

प्रति,

.........................,

..........................

..........................

नागपूर.

विषय :- सन २०२१-२२ करीता परिचर्या वसतिगृहात भोजन व्यवस्था पूरविण्याकरीता ई-दरपत्रके भरण्याबाबत.....

मा.महोदय,

संस्थेतील परिचर्या महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांना भोजन पूरविण्याबाबत खानावळ सुरु करण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीमध्ये ई-दरपत्रके मागवून घेण्यात यावे. पुरवठादारांनी दरपत्रके सिलबंद लिफाफयामध्ये (दोन लिफाफा पध्दतीने) दि.१८/०८/२०२१ ते दि.२४/०८/२०२१ कार्यालयीन वेळे पर्यंत रुग्णालय खरेदी विभागामध्ये/परिचर्या महाविद्यालया येथे सादर करावे. सोबत दरपत्रक फॉर्म जोडण्यात येत आहे.

**सहपत्र : दरपत्रक फॉर्म.**

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर.

Scanned By Scanner Go